# जाहिरात

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
## पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड, पुणे यांचे कार्यक्षेत्रामधील सर्व झोपडपट्टी मिळकतीसंदर्भातील मालकी हक्काविषयी टायटल व सर्च रिपोर्ट तयार करणे तसेच महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निमूर्लन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ अंतर्गत कायदे विषयक बाबींबाबत कायदेशीर सल्ला देणेकरिता ॲडव्होकेट पॅनेल वर विधी तज्ञांची करार पध्दतीने ३ वर्षाच्या कालावधीकरीता मानधन तत्वावर सेवा उपलब्ध करावयाची आहे. त्याकरीता प्राधिकरणाच्या ॲडव्होकेट पॅनेलवर कार्यरत होण्यास इच्छुक व पात्र उमेदवारांकडून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे www.srapune.in या संकेतस्थळावर अर्ज मागविण्यात येत आहेत.

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाच्या विधी पॅनेलवर काम करणेकामी उमेदवारांसाठी सर्वसाधारण अटी व शर्ती खालीलप्रमाणे असतील :-**

१. अर्जदार हा भारताचा नागरिक असावा.
२. मान्यता प्राप्त विद्यापीठाची विधी शाखेची पदवी धारण केलेली असावी.
३. अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास अर्जदाराचे वय किमान ३३ ते ५५ वर्षाच्या दरम्यान असावे.
४. अर्जदार यांनी वकीली व्यवसायाची सनद धारण केलेली असावी व अर्जदारास दिवाणी व महसुली न्यायालयातील प्रत्यक्ष प्रकरण चालविण्याचा किमान १० ते १५ वर्षांचा अनुभव असावा.
५. अर्जदारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
६. अर्जदारास प्रामुख्याने महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निमूर्लन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणेसाठी विकास नियंत्रण नियमावली, २०२२, विशेष नियमावली, २०१४, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६, महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६, फौजदारी व दिवाणी प्रक्रिया संहिता व इतर प्रचलित कायद्यांचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.
७. निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना या कार्यालयाच्या पॅनेलवर विशेष अटी व शर्तीवर कार्यरत होण्यास अनुमती देण्यात येईल.

<u>अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :-</u>

१) विहित नमुन्यातील अर्ज,

२) शैक्षणिक अर्हते संदर्भात सर्व गुणपत्रके व प्रमाणपत्रे, (सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर कराव्यात) व बार कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र.

३) वयाच्या पुराव्याकरिता जन्म दाखला अथवा माध्यमिक शाळा उत्तीर्ण प्रमाणपत्र अगर समकक्ष पुरावा.

४) अर्जदाराने त्यांचे अनुभवा बाबतचे स्व-साक्षांकित घोषणापत्र सादर करावे.

५) ज्या वकील संघाचे सभासद असतील त्या वकील संघाच्या वकीली व्यवसायाचा अनुभवाचा दाखला.

<u>निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया :-</u>

१) प्राप्त अर्जांची छाननी करून मुलाखतीसाठी पात्र /अपात्र उमेदवारांची यादी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणेच्या www.srapune.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल.

२) प्राप्त अर्जांची छाननी उमेदवाराची शैक्षणिक अर्हता, कामाचा अनुभव व झोपुप्रा अधिनियमातील कामकाज व इतर तद्अनुषंगिक बाबींच्या आधारे करण्यात येईल. त्यास अनुसरुन त्यांचे गुणांकन केले जाईल व विशिष्ट गुणांकनाच्या वरील उमेदवारांनाच मुलाखतीसाठी निमंत्रित केले जाईल.

३) अर्जदारांची निवड ही मुलाखतीमधील गुणांच्या आधारे करण्यात येईल.

४) मुलाखतीस येताना मुळ कागदपत्रे आणणे आवश्यक आहे.

५) ॲडव्होकेट पॅनेल निवडीसाठी गठीत केलेल्या समितीमार्फत मुलाखतीद्वारे उमेदवारांची निवड केली जाईल. मुलाखतीचे गुणांकन करताना विचारात घ्यावयाच्या बाबी व कोणत्या बाबीस किती गुण द्यावेत हे ठरविण्याचा तसेच विहित पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून योग्य उमेदवार निवडीबाबत संपूर्ण अधिकार निवड समितीस राहतील.

६) ॲडव्होकेट पॅनेलवर निवडीची प्रक्रिया कोणत्याही स्तरावर स्थगित करणे/ तहकूब करणे/ रद्द करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचेकडे राखीव राहतील.

**ॲडव्होकेट पॅनेल वरील निवड केलेल्या वकिलांना खालीलप्रमाणे वकिल फी अनुज्ञेय राहील.**

| अ.क्र. | तपशील | वकील फी | एकूण फी (रू.) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | टायटल ॲण्ड सर्च रिपोर्ट तयार करणे. (जमिनीच्या शोध व मालकीसंदर्भातील अहवाल तयार करणे). | रू. ८०००/- (शोधणावळ फी वगळून) | ८०००/- | सदरील वकील फी संबंधित पॅनल वकीलास संबंधित योजनेच्या विकसकाकडून अदा करण्यात येईल. |
| २. | प्राधिकरणाच्या कामकाजासंदर्भात अभिप्राय | रू.४०००/- प्रति प्रकरण | ४०००/- | गुंतागुतींच्या कायदेशीर प्रकरणी अभिप्राय घेण्यात येतील. या संदर्भातील वकिल फी प्राधिकरणाकडून अदा केली जाईल. |

ॲडव्होकेट पॅनल वर नियुक्त वकिलांचे कर्तव्ये, जबाबदाऱ्या व वकील फी अदा करणेच्या संदर्भातील अनुषंगिक बाबी खालील प्रमाणे राहतील :-

जमिनीच्या टायटल व सर्चबाबत :-

अ. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंर्तगत प्रस्तावित करण्यात येणाऱ्या/करण्यात आलेल्या जमिनीचे संदर्भात विकसकामार्फ़त उपलब्ध करून देण्यात आलेल्या अधिकार अभिलेखांच्या व कागदपत्रांच्या आधारे प्रत्येक कायदेशीर बाबी काटेकोरपणे तपासून जमिनीचे अचूक मालकीहक्कासंदर्भातील सुस्पष्ट टायटल ॲण्ड सर्च रिपोर्ट देणे, आवश्यक तेथे अतिरिक्त कागदपत्रे प्राधिकरणाकडून उपलब्ध करून घेऊन अचुक अभिप्राय सादर करणे.

आ. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडील नोंदणीकृत विकसकाची मालकी खाजगी असल्यास त्याला सदर जमिनीमधील प्राप्त मालकी हक्क अथवा विकसन हक्क निर्वेध, निर्जोखमी व विक्री योग्य/हस्तांतरणयोग्य असलेबाबतचे पडताळून त्यासंदर्भात प्रमाणित करणे.

इ. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेखालील जमिन शासकीय/निमशासकीय असल्यास जमीनीचे अधिकार अभिलेख, भूसंपादन तपशील, निवाडा व इतर कागदपत्रांच्या आधारे जमीन मालकी हक्कासंदर्भातील सुस्पष्ट टायटल ॲण्ड सर्च रिपोर्ट काटेकोरपणे व जबाबदारीने तयार करणे.

ई. जमिनीच्या टायटल व सर्चकरीता नियुक्त करण्यात येणा-या पॅनल ॲडव्होकेट्स यांना या कार्यालयाचे नोंदणीकृत विकसक परस्पर संपर्क साधून त्यांचेकडे जमिनीचे टायटल व सर्च रिपोर्ट संदर्भातील कामकाज वर्ग करतील. तसेच, अशा पॅनल ॲडव्होकेटला व्यक्तिश: या प्राधिकरणाकडून उपरोक्त नमूद कामकाज देण्यात येणार नाही. जमिनीच्या टायटल व सर्चकरीता अनुज्ञेय होणारे शुल्क तथा फ़ी संबंधित पॅनल ॲडव्होकेटला विकसकामार्फ़त परस्पर अदा करण्यात येईल व यासंदर्भात नियुक्त पॅनल ॲडव्होकेट यांना त्यांच्या उपरोक्त शुल्काबाबत या प्राधिकरणाकडे कोणतीही मागणी करता येणार नाही.

उ. पॅनलवरील एखाद्या ॲडव्होकेट्ला त्यांचेकडे टायटल व सर्चकरीता विकसकामार्फ़त कामकाज सोपविण्यात आल्यास त्यांनी कागदपत्रांच्या आधारे जमिनीचे टायटल व सर्च रिपोर्ट संपूर्ण जबाबदारीने व काळजीपूर्वक देणे अनिवार्य राहील. भविष्यात पॅनलवरील कोणत्याही ॲडव्होकेट यांनी जमिनीच्या मालकी हक्कासंदर्भातील टायटल व सर्च अहवाल चुकीच्या पध्दतीने, बेजबाबदारीने व निष्काळजीपणे दिल्याचे निष्पन्न झाल्यास अशा पॅनल ॲडव्होकेटची नियुक्ती रद्द करण्याचा सर्वस्वी अधिकार या प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहील. अशा प्रकरणी निर्माण होणाऱ्या दायित्वास संबंधित वकील जबाबदार राहतील.

ऊ. प्राधिकरणास पॅनलवरील नियुक्त ॲडव्होकेट यांचेकडून महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निमूर्लन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ व इतर संबंधित अधिनियमाअंतर्गत कोणतेही अभिप्राय घेणे आवश्यक वाटल्यास अशा पॅनेल ॲडव्होकेटकडून स्वतंत्ररित्या पत्राद्वारे अभिप्राय मागविण्यात येईल. अशा कायदेशीर अभिप्रायाचे शुल्क या प्राधिकरणामार्फत प्रकरणपरत्वे ठरविण्यात येईल.

**अर्जदारांना सर्वसाधारण सूचना :-**

१. पॅनल ॲडव्होकेटकरिता करावयाच्या अर्जाचा नमुना पुणे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्या www.srapune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. सदर अर्जात अर्जदार यांनी त्यांचे संपूर्ण नाव पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता, पिनकोड नंबर, भ्रमणध्वनी/दूरध्वनी क्रमांक, ई-मेल पत्ता, शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. विषयक माहिती आवश्यक त्या साक्षांकित प्रतीसह सादर करणे आवश्यक आहे.

सतीशकुमार खडके (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे**

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे पॅनलवर नियुक्त करण्यात येणाऱ्या पॅनल ॲडव्होकेटकरिता अर्जाचा नमुना.**

| अ. क्र. | नाव | |
|---|---|---|
| १. | कायमस्वरूपी पत्ता व संपर्क क्र. | |
| २. | ईमेल आयडी. | |
| ३. | जन्मदिनांक | |
| ४. | शैक्षणिक अर्हता | |
| ५. | विद्यापीठाचे नाव | |
| ६. | अनुभव | |
| ७. | बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा यांचेकडील धारण केलेली सनद दिनांक. | |
| ८. | जिल्हा न्यायालयापुढे चालविलेल्या प्रकरणांचे स्वरूप व संस्था. | |
| ९. | मा. उच्च न्यायालयापुढे प्रकरण चालविले असल्यास त्याचा तपशील. | |
| १०. | गृहनिर्माण विभागाकडील शिखर तक्रार निवारण समितीपुढे प्रकरण चालविले असल्यास त्याचा तपशील. | |
| ११. | इतर शासकीय कार्यालयातील पॅनेलवर नियुक्त असल्यास त्याचा तपशील. | |
| १२. | इतर शासकीय कार्यालयातील पॅनेलवर नियुक्त असल्यास त्याचा तपशील. | |

स्थळ : --------------

दिनांक : -----------

-------------------------

अर्जदाराची नाव व स्वाक्षरी